सैन्यातील धारातीर्थी पडलेल्या महाराष्ट्रातील
अधिकारी व जवान याच्या विधवा / अवलंबितांना
तसेच अपंगत्व प्राप्त झालेल्या अधिकारी
आर्थिक मदत देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.मासैम २०१०/४९५/प्र.क्र.१६९/२८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १६.०९.२०११

**वाचा** - १)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मासैम १०९९/१६६१/प्र.क्र.१२६/९९/२८, दिनाक ०४.१०.२०००.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मासैक २००२/९३३/प्र.क्र.८६/२००२/२८, दिनाक ०९.१२.२००३.
३)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०२५/सैकवि-१६/१५१० व १४८७, दिनांक २८.०३.२०११.
४)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०१९/अ/सैकवि-१६/१५२४ व १५१३, दिनांक २८.०३.२०११.
५)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१२०३१/सैकवि-२/सैकवि/३५७७, दिनांक ०५.०८.२०११.

**शासन निर्णय** -

संदर्भाधीन अ.क्र. (१) व (२) यंथील शासन निर्णयाव्दारे जम्मू-काश्मिर मंधील नियंत्रण रेषेजवळील क्षेत्रात तसेच देशांतर्गत भागात मे, १९९९ पासून निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाच्या परिस्थितीत / चकमकीत / मोहिमेअंतर्गत धारातीर्थी पडलेल्या सैन्यदलातील महाराष्ट्र राज्यातील सैनिकांच्या विधवांना /अवलंबितांना प्रत्येकी रु. ५.०० लाख याप्रमाणे ऐकवेळची आर्थिक मदत देण्याबाबत त्याचप्रमाणे गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व आलेल्यांना त्यांच्या अपंगत्वाच्या प्रमाणानुसार रु.१.०० लाख व रु.३.०० लाख इतकी आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी संदर्भाधिन अ.क्र.(३) ते (५) च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावात अंतर्भूत खालील तक्त्यात नमूद केलेल्या युध्दजन्य परिस्थितीत / चकमकीत / मोहिमेअंतर्गत धारातीर्थी पडलेल्या महाराष्ट्र राज्यातील जवानाच्या अवलंबितांना तसेच गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना खाली दर्शविल्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

कृ.मा.प.

ब) धारातीर्थी पडलेले जवान (रु. ५ लाख प्रमाणे एक वेळेची आर्थिक मदत )

| अ. क्र. | नाव | मृत्यु दनांक / माहिम | वारसाचे नाव व आर्थिक मदतीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कै.अनिल रमेश पवार,<br>१५६८२५८७ एक्स,<br>सिग्नलमॅन<br>३ इन्फन्ट्री डिव्हीजन<br>सिग्नल रेजिमेंट | २१.११.२००८<br>ऑपरेशन रक्षक<br>(जम्मु - काश्मिर) | सौ.निर्मलाबाई रमेश पवार (वीरमाता) - रु.२.५ लाख<br>श्री.रमेश देवराम पवार (वीरपिता) - रु. २.५ लाख<br>मु.इंधवे, पो.जिराळी, ता.पारोळा, जि.जळगाव |
| २ | कै.दिपक गुलाब चौधरी,<br>१४४४१६८४ ए,<br>गनर,<br>३४, राष्ट्रीय राईफल्स (जाट)(२८६ फिल्ड रेजीमेंट) | २७.१०.२०१०<br>ऑपरेशन रक्षक<br>(जम्मु - काश्मिर) | श्रीमती भारती दिपक चौधरी (वीरपत्नी) - रु.३ लाख<br>सौ.उषाबाई गुलाब चौधरी (वीरमाता) - रु.१ लाख<br>श्री.गुलाब हरि चौधरी (वीरपिता ) - रु.१ लाख<br>मु.पो. पातोंडा, ता.अमळनेर, जि.जळगाव |

ब) गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेले जवान

| अ. क्र. | नाव व पत्ता | मोहिम,दिनांक व अपंगत्वाचे प्रमाण | दिनांक ०४.१०.२००० च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री. परमेश्वर आत्माराम पानसरे,<br>२७९७८०७ एच<br>शिपाई<br>१२ मराठा लाईट इन्फन्ट्री,<br>मु.पो.खडकी घाट, ता.जि. बीड. | ०५०३.२००३<br>ऑपरेशन रक्षक<br>(जम्मु -काश्मिर)<br>२० % | रुपये १.०० लाख |
| २ | श्री. सुभाष लिंबाजी काळे,<br>१४९३०१२५ एफ,<br>लान्स नाईक,<br>१० मेकॅनाईजड इन्फन्ट्री,<br>(१६ राष्टीय राईफल्स )<br>मु.देसूर, पो.बीड सांगवी, ता. आष्टी,<br>जि. बीड. | १७.०७.२००७<br>ऑपरेशन रक्षक<br>(जम्मु -काश्मिर)<br>२० % | रुपये १.०० लाख |

...३/-

२. वरील परिच्छेद क्र.(१) मध्ये नमूद केलेल्या धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या अवलंबितांना तसेच गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेले जवानांना द्यावयाची आर्थिक मदती रु.१२,००,०००/- (रुपये बारा लाख फक्त) इतक्या रक्कमेपैकी ४०% म्हणजे रु. ४,८०,०००/- ( रुपये चार लाख ऐंशी हजार फक्त) शासकीय अनुदानातून तर उर्वरित ६०% रक्कम रु.७,२०,०००/- (रुपये सात लाख वीस हजार फक्त) मुख्यमंत्री सहायता (कारगिल) निधीतून घेण्यात आलेल्या व राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविण्यात आलेल्या रु.२२.२२ कोटी रक्कमेच्या व्याजातून अदा करण्यात यावी.

३. उपरोक्त परिच्छेद क्र. (२) मधील प्रयोजनार्थ होणारा रु. ४,८०,०००/- ( रुपये चार लाख ऐंशी हजार फक्त) इतका खर्च मागणी क्र.ए-५ लेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० - इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, १०२- सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतन- (००)(०४), देशांतर्गत सुरक्षासंबंधी मोहिमेत / चकमकीत धारातीर्थी पडलेल्या सैन्यातील जवानांच्या विधवांना / अवलंबितांना आर्थिक मदत (२२३५- २६०-८)५०-इतर खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०११ - २०१२ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. धारातीर्थी पडलेल्या जवानसंच्या अवलंबितांना तसेच गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना द्यावयाची आर्थित मदत संबंधित जिल्हयांच्या पालक मंत्र्यांच्या हस्ते देण्यात यावी.

५. याबाबत संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी संबंधित पुरस्कारार्थ्यांना सदरहू रक्कम लाभार्थ्यांची पात्रता काळजीपूर्वक तपासण्यात आली आहे. लाभार्थ्यांची पात्रता काळजीपूर्वक तपासून विहीत मुदतीत देण्याच्या सूचना त्याच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय अधिका-यांना द्याव्यात व तत्संबंधीचा अहवाल तात्काळ शासनास पाठवावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निगर्मित केलेल्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मासैम १०९९/१६६१/प्र.क्र.१२६/९९/२८, दिनाक ०४.१०.२००० तसेच क्र. मासैक २००२/९३३/प्र.क्र.८६/२००२/२८, दिनाक ०९.१२.२००३ मधील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन निर्गमित करण्यात येत आहे.

...४/-

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्र. २०११०९१६१५३००५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गो.आ. लोखंडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मंत्री (मासैक) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (मासैक) यांचे स्वीय सहायक
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई(शाखा ड-५/ड-६)(२ प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
कमांडर, महाराष्ट्र-गुजरात एरिया मुख्यालय, कुलाबा, मुबई ४०० ००५,
जिल्हाधिकारी, जळगाव व बीड,
जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव व बीड,
संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे ४११ ००६ ( ५ प्रती),
जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जळगाव व बीड,
सह संचालक, लेखा व कोषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला,
नवीन प्रशासन भवन, मुंबई ३२,
महासंचालक, माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
वित्त विभाग, (व्यय ४),
सामान्य प्रशासन विभाग (कार्या २५)
निवड नस्ती ( २ प्रती).

E:\TEMP\old data\desktop\Paikar16